# स्वराज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांनी सध्या भारत, पाकिस्तान श्रीलंका व म्यानमार या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशावरील आपली सत्ता सोडली. असे इंग्रजांनी का केले याचे या देशात फारसे आकलन कुणाला नाही. इंग्रजांनी आपले साम्राज्य बरखास्त करण्याच्या दोन वर्षे आधीच दुसरे महायुद्ध जिंकले होते व भारताच्या स्वराज्यासाठी १९४२साली झालेला अन्तर्गत उठाव व सुभाषचंद्र बोस यांची आझादहिंद फौज यांचा सपशेल पराभव केला होता. त्यावेळी अवघ्या दोन वर्षांनी इंग्रज आपले चम्बूगबाळे उचलून निघून जाणार आहेत असे कुणी म्हटले असते तर त्याचे हसे झाले असते.

'इंग्रज स्वेच्छेने गेले नसून आम्ही त्यांना हाकून लावले' असा एक ग्रह या देशात बराच सार्वत्रिक आहे. त्यातून अण्वस्त्रे व उदजनास्त्रे यांनी सज्ज असलेल्या इंग्रजांना हटविण्याचे सामर्थ्य आमच्या अहिंसेत व आध्यात्मिकतेत होते असे सांगणारा गांधीवाद्यांचा एक वर्ग आहे. गांधींची पद्धत वापरून चीनला नमविण्याचा विचार श्री शंकरराव देव यांनी केला होता. त्यांना 'चीनच्या सरहद्दीच्या आत घुसाल तर खबरदार' म्हणून सरहद्दीवरूनच हाकलून देण्यात आले. गोवा पोर्तुगीजांच्या हातून सोडविण्यासाठी बरेच सत्याग्रह झाले पण भारतीय सैन्याने गोव्यावर सरळ स्वारी केली तेव्हाच गोवा मुक्त झाला. आध्यात्मिक बळाने व अहिंसेने ब्रिटिश सामाज्राचा पराभव केला या मताचा पोकळपणा यावरून स्पष्ट व्हावा.

ज्या वेळी भारतात सत्तांतर झाले त्यावेळी मी ऑक्स्फर्डमध्ये होतो. तेथे एका ब्रिटिश लोकसभासदस्याचे भाषण झाले. व्याख्यानानंतर मी त्याची भेट घेऊन तुम्ही भारत सोडून का जात आहात? असे स्पष्ट विचारले. तेव्हा त्याने उत्तर दिले की 'साम्राज्य बरखास्त करणे हे आम्हाला आर्थिक दृष्ट्या फायद्याचे आहे' हाच सिद्धांत बर्ट्रॅण्ड रसेलने आपल्या 'फ्रीडम अॅण्ड ऑर्गनायझेशन' या ग्रंथात माण्डला आहे. हा ग्रंथ सत्तान्तराच्या निदान एक दशकापूर्वीचा आहे. याच्याही पूर्वी मार्क्सने भारतावर राज्य करणे ब्रिटनला तोट्याचे आहे असे विधान केले होते. हे विधान भारताच्या इंग्रजी सरकारचा आयव्यय तोट्याचा आहे या तथ्यावर आधारले होते.

भारतावर राज्य करणे आर्थिकदृष्ट्या तोट्याचे आहे हे विधान मला विश्वसनीय वाटते. काही लोक म्हणतात त्याप्रमाणे 'अंगुर खट्टे' या जातीचे ते नाही. कारण १९४७साली इंग्रजांना भारत सोडायला भाग पाडील अशी कोणती व शक्ति भारतात नव्हती. बर्ट्रॅण्ड रसेल व त्यापूर्वी मार्क्सने केलेल्या विधानाबद्दल तर 'अंगुर खट्टे' हे स्पष्टीकरण उच्चारण्याची देखील सोय नाही. कारण ही विधाने केली गेली तेव्हा इंग्रजांचे साम्राज्य सम्पुष्टात येण्याची काहीही चिन्हे नव्हती. मार्क्स हा तर इंग्रज नसून जर्मन ज्यू होता व त्याला ब्रिटिश साम्राज्याबद्दल अभिमान वाटण्याचे काही कारण नव्हते.

## घाट्याचा धंदा?

भारतावरील इंग्रजी राज्य हा घाट्याचा धंदा आहे हे विधान मार्क्सने केले ते मुख्यत: इंग्रजी भारत सरकारचे अंदाजपत्रक घाट्याचे होते या आधारावर केले. याबद्दल एक मुद्दा स्पष्ट होत नाही. ब्रिटनमधील औद्योगिक क्रान्ति भारताचे शोषण केल्यामुळे झाली हे मार्क्सला मान्य होते. तेव्हा भारत सरकारचे अंदाजपत्रक घाट्याचे असले तरी त्यावरून भारतावर राज्य करण्यात ब्रिटनचा काही फायदा नाही असे याला म्हणायचे होते असे वाटत नाही. आज भारताचे अन्दाजपत्रक तुटीचे आहे यावरून भारताची अर्थव्यवस्था तोट्याची आहे असे ठरत नाही. स्वराज्यानंतर ब्रिटिशांनी मुक्त केलेल्या सर्व देशांची आर्थिक प्रगति दर वर्षी तीन चार टक्क्यांनी का होईना पण होत आहे. तेव्हा धंदा टोलेजंग नफ्याचा नसला तरी आतबट्ट्याचा नाही.

भारतातील ब्रिटिश सरकारचे अन्दाजपत्रक घाट्याचे होते याचे कारण ब्रिटनमधील कारखान्यासाठी जो कच्चा माल भारतातून जात होता त्याचा मोबदला ब्रिटनचे सरकार देत नव्हते. तो मोबदला भारताच्या अन्दाजपत्रकातूनच वसूल केला जाई. तेव्हा भारताचे अन्दाजपत्रक तुटीचे होते याचे कारण या तुटीतूनच ब्रिटनची तुंबडी भरली जात होती.

या प्रकाराचेच वर्णन दादाभाई नौरोजी वगैरे अर्थशास्त्रज्ञांनी दर वर्षी शेकडो महम्मद गझनवीच्या स्वाऱ्या असे केले होते.

**'इंग्रज स्वेच्छेने गेले नसून आम्ही त्यांना हाकून लावले' असा एक ग्रह या देशात बराच सार्वत्रिक आहे. त्यातून अण्वस्त्रे व उदजनास्त्रे यांनी सज्ज असलेल्या इंग्रजांना हटविण्याचे सामर्थ्य आमच्या अहिंसेत व आध्यात्मिकतेत होते असे सांगणारा गांधीवाद्यांचा एक वर्ग आहे. गांधींची पद्धत वापरून चीनला नमविण्याचा विचार श्री शंकरराव देव यांनी केला होता. त्यांना 'चीनच्या सरहद्दीच्या आत घुसाल तर खबरदार' म्हणून सरहद्दीवरूनच हाकलून देण्यात आले.**

१८५७चा जो राष्ट्रीय उठाव झाला तो या लुटीने जनता बेजार झाल्यामुळेच झाला. १८५७चा उठाव हे स्वातंत्र्ययुध्द नव्हते वगैरे निरर्थक बडबड पुष्कळ झाली. पण या स्वातंत्र्ययुध्दाचे सगळ्यात मोठे निंदक जे रमेशचन्द्र मजुमदार त्यांच्याच लिखाणावरून हे स्पष्ट होते की इंग्रजी शिकून सरकारी नोकऱ्या करणाऱ्यांचा वर्ग सोडला तर देशातील साऱ्या धर्मांचे व साऱ्या पेशांचे लोक या स्वातंत्र्य युध्दात सामिल झाले होते. असे पुढे कधीच झाले नाही. गांधींच्या चळवळीत मुख्यत: सवर्ण हिंदुतील पांढरपेशे काही हजारांच्या संख्येने सामिल झाले. पण त्यातलेही पुष्कळसे या चळवळीबद्दल उदासीनच होते. पांढरपेशापैकी एक मोठा वर्ग सरकारी नोकरीत होता. तो आपल्या सुखासीन नोकऱ्यांना चिकटून राहिला. मुसलमान व अनुसूचित जाती यांबद्दल तर बोलायलाच नको. ही चळवळ सवर्ण हिंदूच्या वर्चस्वासाठी आहे असे त्यापैकी पुष्कळसे प्रतिष्ठित पुढारी उघडच म्हणत.

या चळवळीत अवघे ६०,०००लोक तुरुंगात गेले. उलट १८५७च्या संग्रामात त्या वेळी भारताची लोकसंख्या सत्याग्रही भारताच्या मानाने अर्ध्याच्या जवळपास असली तरी एक लाख सैनिक व एक लाख असैनिक सामिल झाले होते. भारतात असा एकही प्रांत नव्हता की जेथे उठाव झाला नाही. दक्षिण भारतात मुळीच उठाव झाला नाही अशी पूर्वी समजूत होती. पण श्री दिवेकरांनी तत्कालीन कागदपत्रे तपासून दाखवून दिले आहे की दक्षिण भारतात प्राय: असा एकही जिल्हा नाही की जेथे उठाव झाला नव्हता. पण उठावाने उग्र स्वरूप धारण करण्याच्या आधीच इंग्रजांना तो दडपता आला. कारण उत्तरेतील अकाली उठावाने ते सावध झाले होते. त्याच काळी तारायंत्राचा शोध लागला व हेरांनी मिळविलेली बातमी भारताच्या कोठल्याही कोपऱ्यात क्षणार्धात पोचविता येऊन उठाव मुळातच ठेचून काढणे इंग्रजांना शक्य झाले. हे खरे असले तरी हौतात्म्य पत्करलेल्यांची संख्या उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतात कमी नव्हती.

**सत्तावनाचा उद्रेक शोषणनीतीमुळे**

घडलेल्या प्रकारावरून हे ही सिद्ध होते की युद्धप्रेरक भावना कितीही तीव्र असल्या तरी अद्ययावत् शस्त्रास्त्रे व यन्त्रणा यांच्यापुढे निकृष्ट शस्त्रास्त्रे टिकाव धरू शकत नाहीत. ५७च्या सगळ्याच क्रान्तिकारकाजवळ बंदुका नव्हत्या. पुष्कळसे क्रान्तिकारक भाला- तलवारींनीच लढत होते. एतद्देशीयांच्या तोफांचा पल्ला कमी होता. म्हणूनच झाशीच्या तटावर इंग्रजी तोफांचा अव्याहत भडीमार होत असतानाही किल्ल्यावरील 'घनगर्ज' व 'कडकबिजली' या तोफा त्यांना प्रत्युत्तर देऊ शकल्या नाहीत.

इंग्रजांचे धर्मपरिवर्तनाचे धोरण हे सत्तावनच्या उठावाचे प्रधान कारण सांगण्यात येते. पण इंग्रजांच्या धर्मपरिवर्तनाच्या धोरणापेक्षा मुघलांचे अधिक आततायी होते. तरी मुघलांच्या विरुद्ध साऱ्या भारतात एकाच वेळी सार्वत्रिक व सक्रिय द्वेष कधीच उफाळून आला नाही. बहुसंख्य लोक राज्यकर्त्यांच्या जिहादला व जिझियाला न जुमानता आपल्या धर्माचे पालन करीत राहिले.

खिस्तीकरणाचे इंग्रजांचे धोरण हे सत्तावनच्या सार्वत्रिक उद्रेकाचे मुख्य कारण नव्हते. मुख्य कारण इंग्रजी राज्यामुळे कधीच भिकारी नसलेला देश पाहता पाहता भिकेस लागला हे होते (अधिक माहितीसाठी पहा डॉ. नी. र. वऱ्हाडपाण्डेकृत 'सत्तावनचे स्वातंत्र्ययुध्द आणि त्याचे निंदक')

भारतीयांना भिकेस लावण्याचे इंग्रजी धोरण १८५७च्या पूर्वी अधिक जोमात सुरू होते असे दिसते.

सगळ्यात आधी बंगालमध्ये इंग्रजी राज्य आले. इंग्रजी राज्य येण्याचा क्रम व प्रदेशाचे दारिद्र्य यात सहभाव आहे. पंजाब सर्वात शेवटी ब्रिटिशाधीन झाला. भारताचा तो सर्वात कमी दरिद्रि प्रान्त होता. बंगाल सगळ्यात आधी ब्रिटिशाधीन झाला तो सर्वात जास्त दरिद्रि होता.

सारा भारत हाती आल्यावर ब्रिटिशांची शोषणनीति सुरू राहिली नाही असे म्हणता येत नाही. पण १८५७नंतर ब्रिटिशांची राज्यव्यवस्था अधिक चोख होऊ लागली. तत्पूर्वीची पेशवाई हे तुलनात्मक दृष्ट्या सुराज्य होते अशी सर जॉन माल्कम याने ग्वाही दिली आहे. सर जॉन माल्कम याला

पेशव्याकडून जिंकलेल्या मुलखाचे राज्य चालविण्याचे काम सोपविण्यात आले होते. त्याला १८३२साली ब्रिटिश पार्लमेण्टच्या सदस्यांनी विचारले. आता मराठ्यांची पुण्डाई संपून आपले राज्य झाले आहे तेव्हा सगळीकडे सुव्यवस्था स्थापित झाली असेल. यावर त्याने उत्तर दिले की, पेशव्यांच्या राज्यापेक्षा अधिक सुव्यवस्था स्थापित होणे अजून पुष्कळ दूर आहे सध्या त्यांच्याइतके चांगले राज्य परत आणणे हेच साधले तर पुष्कळ आहे.

तात्पर्य, केवळ आर्थिक धुळधाणच नव्हे तर कायदा व सुव्यवस्था ही देखील कंपनीच्या राज्यात नव्हती. ती १८५७नंतर हळूहळू स्थापित झाली. आर्थिक पिळवणूक मात्र तशीच चालू राहिली.

आर्थिक पिळवणूक सुरू ठेवून देखील इंग्रजांचे साम्राज्य त्यांना आर्थिकदृष्ट्या नुकसानीचे होऊ लागले. कारण कोंबडी अंडी देते म्हणून ताबडतोब सर्व अण्डी फस्त करण्याच्या इराद्याने कोंबडीचे पोटच अंड्यासाठी फोडणाऱ्या अधीर कुक्कुटपालकाची चूक इंग्रजांनी केली होती.

**साम्राज्यवादापुढील शृंगापत्ती**

कोंबडी फाडून खाल्ल्यामुळे तिच्यावरचा खर्च वाचेल व तिचे मास खायला मिळून फायदाही होईल. पण चिरस्थायी लाभ पाहिजे असेल तर कोंबडीची चांगली राखण करणे हाच सुबुद्ध मार्ग आहे. या मार्गाने फायदा होण्यास वेळ लागला तरी फायदा करून घेण्याचा दुसरा मार्ग नाही. साम्राज्यातील देश समृध्द असतील तर सम्राटाची समृध्दि वाढेल. ते देश भिकारी असतील तर सम्राट समृध्द कसा होणार? तोही आपल्या प्रजेप्रमाणे भिकारीच होणार तेव्हा साम्राज्यापासून आर्थिक लाभ करून घेण्यासाठी इंग्रजांनी भारतासारख्या देशांना समृध्द करण्याचा कार्यक्रम आखायला पाहिजे होता.

असे त्यांनी केले नाही याचे एक कारण आहे. देश समृध्द होण्यासाठी तो प्रगत व्हायला पाहिजे. भारतासारखे देश प्रगत झाले असते तर सत्तावनसारखा उठाव झाल्यास तो इंग्रजांना हार गेला नसता. तेव्हा देश अंकित ठेवायचा तर तो अप्रगत राहिला पाहिजे व आपला आर्थिक लाभ होण्यासाठी त्याला प्रगत केले तर तो आपल्या हातून निसटण्याची भीति उत्पन्न होते.

ही शृंगापत्ती स्त्रीपुरूषसंबंधाच्या शृंगापत्तीसारखी आहे. स्त्रीचा सहवास आनंददायक व्हायचा असेल तर ती सुसंस्कृत व प्रगल्भ असली पाहिजे. तसेच ती आपल्या अंकितही असली पाहिजे. पण अडाणी स्त्रीला अंकित ठेवणे जेवढे सोपे आहे तेवढे प्रगल्भ स्त्रीला अंकित ठेवणे सोपे नाही. तेव्हा स्त्रीला प्रगल्भ करावे तर ती आपल्या अंकित राहत नाही व अडाणी ठेवावे तर तिचा सहवास आनंददायक राहत नाही.

इंग्रजांनी देशाला अप्रगत ठेवण्याचे धोरण राबविल्यामुळे इंग्रजांचे साम्राज्य हा तोट्याचा धंदा झाला व साम्राज्य बरखास्त करण्याने आपला फायदा होईल असा निर्णय त्यांना घ्यावा लागला.

पण केवळ साम्राज्य आर्थिकदृष्ट्या तोट्याचे होते एवढेच कारण ते बरखास्त करण्याच्या निर्णयाला पुरेसे नव्हते. कारण साम्राज्य तोट्याचे आहे हे त्यांच्या लक्षात निदान पन्नास वर्षे आधीच आले होते. या निर्णयाला पन्नास वर्षे वाट पहावी लागली. कारण पूर्वीची शोषणाची नीति बदलून साम्राज्यातील देशांना प्रगत करणे हा दुसरा पर्याय आचरून पाहता येण्यासारखा होता. भारतातील सगळया नद्या एकमेकांना जोडून त्यांचा शेतीसाठी त्याचप्रमाणे नाविक वाहतुकीसाठी उपयोग करणे वगैरे कल्पना ब्रिटिश काळात मांडण्यात येत होत्या. पण

साम्राज्य समृध्द करण्याचा प्रयत्न केला तरी १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध व पुढील स्वातंत्र्याच्या चळवळी लक्षात घेता भारतीयांना सारी सत्ता ब्रिटनमध्ये केंद्रित असलेले राज्य आपले वाटेल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे हे इंग्रजांना दिसून येते होते. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध हे देखील भारताला ब्रिटनेच आंगण बनविण्याच्या कल्पनेला मारक होते. रक्ताने व संस्कृतीने इंग्रज असलेले लोक देखील आपला नवा देश हा इंग्लंडचा भाग आहे असे मानण्यास तयार नाहीत तर ज्यांचे व आपले काहीच नाते नाही असे भारतीय ब्रिटिश राज्याला स्वराज्य मानण्यास तयार होतील असे मानणे शक्य नव्हते. त्यातून दुसरे महायुध्द उद्‌भवले व या महायुध्दातील घटनांनी साऱ्या ब्रिटिश साम्राज्याचेच ग्रेट ब्रिटन करण्याचे स्वप्न पूर्णपणे अवास्तव आहे हे निश्चित झाले.

**दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम**

साम्राज्य घाट्याचे आहे. ब्रिटनला अनुभव असला तरी इंग्लंडशी स्पर्धा करणाऱ्या जर्मनी, इटली, जपान वगैरे देशांना तसे वाटत नव्हते. त्यांना ब्रिटन साम्राज्यामुळे वैभवशाली झाली व ब्रिटनसारखेच आपलेही साम्राज्य असावे असे वाटत होते. जर्मनीने पहिल्या महायुध्दात आपल्याकडून हिसकावल्या गेलेल्या वसाहतींची मागणी नेटाने केली होती. इटलीने अबिसीनिया जिंकून साम्राज्य स्थापन केले होते. जपानची समस्या जर्मनी व इटलीपेक्षा वेगळी होती. जपानमध्ये नैसर्गिक संपत्ती अजिबात नाही. त्यामुळे ती मिळविण्यासाठी बाहेरच्या देशावर ताबा मिळविणे आवश्यक आहे असे जपानला वाटले म्हणून त्याने चीनकडे आपला मोर्चा वळविला.

भारताच्या सरहद्दीवरील रशिया हा देश भारत जिंकण्याची स्वप्ने पाहत आहे असे इंग्रजांना सतत वाटत होते. चीन अशी स्वप्ने पाहण्याइतका कधीच प्रबल नव्हता. पण तो केव्हाही प्रबळ होऊ शकला असता हे पुढील घटनांनी सिद्ध झाले.

तेव्हा आशियातील साम्राज्य टिकवायचे तर जर्मनी रशिया, चीन व जपान या देशाशी संघर्षाची तयारी ठेवणे ब्रिटनला आवश्यक होते. रशिया वाचीन यांच्या संभाव्य आक्रमणा विरूध्द संरक्षणास उपयोगी म्हणूनच ब्रिटिशांनी तिबेट आपल्या हातात ठेवला होता.

जपानने चीनवर आक्रमण केले ते यशस्वी होऊ नये म्हणून ब्रिटन व अमेरिका या दोघांनीही चीनला मोठ्या प्रमाणावर मदत देणे सुरू केले होते. ही मदत इण्डो चायनामधून होत होती. या मदतीचा स्त्रोत बंद केल्याशिवाय जपानचे चीनमधील स्थान धोक्याचेच राहणार होते. तशात अमेरिकेने जपानवर उघडच आर्थिक बहिष्कार टाकला. त्यामुळे आपली उद्दीष्टे साधायची तर जपानला ब्रिटन व अमेरिका या दोघांशीही संघर्ष करणे अटळ होते. अमेरिकेचे आरमार प्रशान्त महासागरात वाटेल तेथे संचार करीत होते. पर्ल हार्बलवर हल्ला करून अमेरिकेचे आरमार निकामी करून टाकले. ते पुन: सावरेपर्यंत जपानला निदान एक वर्षाची उसंत मिळाली. तेवढ्या अवधीत ब्रह्मदेशापर्यंतचा ब्रिटिशांचा मुलूख त्याने जिंकला होता.

जगभर पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्याचे शत्रू देखील जगभर पसरलेले होते. त्यांच्या विरूद्ध साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी ब्रिटनला दर २५/३० वर्षानी युद्ध करावे लागणार होते. या युद्धासाठी ब्रिटन सोडून इतर देशातील सैनिक उपयोगी पडणार नव्हते. कारण परचक्र आले की ते त्याला सहज सामिल होत. सर्व आग्नेय आशियात जपानचा सहज विजय झाला याचे कारण तेथील सर्व देशातले सैनिक जपानला मिळाले. तेव्हा एवढ्या जगड्व्याळ साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी ब्रिटिश सैनिक वापरणे आवश्यक झाले. पण एवढ्या मोठ्या संख्येने ब्रिटनसारख्या टिचभर देशात सैनिक कुठून मिळणार? शिवाय अशी जागतिक युद्धे दर पंचवीस वर्षांनी लढायला ज्रो अतोनात पैसा लागेल तो कुठून आणणार? दुसऱ्या

महायुध्दामुळे ब्रिटनला भारताचे कित्येक अब्ज पौंडांचे कर्ज झाले होते. म्हणजे हा खर्च भारताने केला होता. 'हा खर्च तुमच्या रक्षणासाठी आम्ही केला म्हणून आम्ही तुमचे काही देणे लागत नाही असे भारताला सांगावे' अशी चर्चिलची सूचना होती.

**सत्तांतर व स्वराज्याच्या चळवळी.**

'भारतातील कच्चा माल घेऊन त्याची किमतही भारताच्या उत्पन्नातूनच द्यावी या ईस्ट इण्डिया कंपनीच्या पध्दतीचीच ही सूचना होती. ही सूचना मान्य झाली नाही व साम्राज्य सर्वदा टिकवायचे तर अशा तऱ्हेच्या लूटमारीने टिकविता येणार नाही हे स्पष्ट होते. तेव्हा साम्राज्य बरखास्त केले पाहिजे याच निर्णयाप्रत ब्रिटिश मुत्सद्दी पोचले.

> **काँग्रेसमध्ये मोठमोठे आंग्लशिक्षित भारतीय दरवर्षी जमत व इंग्रज सरकारला आपल्या काही विनंत्या पेश करीत. स्वराज्य म्हणजे ब्रिटिश सत्तेपासून पूर्णपणे स्वतंत्र असे भारतीय राज्य असले पाहिजे ही आकांक्षा बोलून दाखविणे हे देखील अकल्पनीय व हा राजद्रोह ठरेल या भीतीने ग्रासलेली असे.**

हा निर्णय स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे अधिक अटळ झाला.

स्वातंत्र्याच्या लढ्यापैकी सत्तावनाच्या उद्रेकाएवढा मोठा धोका पुढे कधीच निर्माण झाला नाही. तो निर्माण होऊ नये म्हणून इंग्रजांनी दोन प्रकारचे उपाय योजले. पहिला म्हणजे इंग्रजांच्या बळाबद्दल अविस्मरणीय अशी दहशत भारतीयांच्या मनात निर्माण करणे. या साठी प्रत्येक उठाव मोडल्यानंतर नादिरशहा व तैमुरलंग यांना लाजविणाऱ्या कत्तली इंग्रजांनी केल्या. झांशीच्या कत्तलीचे वर्णन विष्णुभट गोडसे यांनी आपल्या 'माझा प्रवास' मध्ये केले आहे. अशाच कत्तली दिल्ली, कानपुर, लखनौ वगैरे सर्व ठिकाणी झाल्या. विजयानंतर ब्रिटिश सैन्याला कत्तल व लूटमार यांची मुभा देण्यात आली. वाटेल त्या नागरिकाला गोळ्या घालण्यात आल्या मग त्याने क्रांतीत भाग घेतला. तासाच्या चौकशीनंतर तोफेच्या तोंडी देण्यात येते असे. ज्यांच्यावर रीतसर खटले चालले त्यांनाच फक्त फाशी देण्यात येत असे.

या प्रकाराने भारतीयांच्या मनात ब्रिटिशाच्या सामर्थ्याची कायमची दहशत बसली व स्वातंत्र्य हे एक वेडेपणाचे स्वप्न आहे ही भावना दृढमूल झाली.

(स्वातंत्र्य हे आकाशकुसुमासारखे आहे असे ठरल्यावर मग पारतंत्र्य हेच भारताच्या हिताचे आहे असे मनाचे समाधान करण्याची प्रवृत्ती बळावली. ही प्रवृत्ती कधीच नष्ट झाली नाही.) तात्या टोपेचे वंशज मला बिठूर येथे भेटले ते दुःखाने म्हणाले. 'आजकाल आमच्या पूर्वजाचे पोवाडे गाण्याची सोय राहिली नाही', बंड यशस्वी झाले असते तर भारत मागासलेलाच राहिला असता ब्रिटिश राज्यामुळे तो सुधारला असे कित्येक प्रवासी आम्हाला सुनावतात.

मी त्यांना म्हटले. 'तुम्ही अशा लोकांना प्रतिप्रश्न करीत जा की, 'ब्रिटिश राज्याच्या कधीच अंकित नसलेल्या देशाशी ब्रिटिशांच्या अंकित असलेल्या देशांची तुलना केली तर सारेच स्वतंत्र देश परतंत्र देशापेक्षा प्रगत आहेत असे दिसून येते. चीन, जपान थायलॅण्ड वगैरे देश परतंत्र नव्हते. हे सारे

देश भारतापेक्षा अनेक पटींनी प्रगत आहेत. भारतात इंग्रज आले तेव्हा हे देश भारतापेक्षा प्रगत होते असा पुरावा नाही. मग पारतंत्र्याने प्रगति होते या म्हणण्यात काय अर्थ आहे?'

आपल्या सामर्थ्याबद्दल दहशत पसरविण्यात इंग्रजांना पुरेपूर यश आले. पण सत्तावनची धास्ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. ध्यानी मनी नसताना सर्वसंहारक असा स्फोट ब्रिटिश राज्याविरूद्ध झाला. तसा पुन: होऊ नये म्हणून जनतेच्या राजकीय आकांक्षा काय आहेत हे त्यांना सांगू दिले पाहिजे. याने दोन कामे साधतील.

एक तर राजद्रोह शिजतो आहे की नाही याची पूर्वकल्पना येण्यास त्यामुळे मदत होईल व दुसरे म्हणजे तोंडची वाफ दवडण्याने मनाला समाधान वाटते व त्याअनुसार कृति करण्याची जरूर वाटत नाही. तोंडची वाफ ही कृतीची जागा घेते.

**हेडगेवारांचे कार्य**

या उद्देशाला मूर्त स्वरूप देण्यासाठी इण्डियन नॅशनल काँग्रेसची स्थापना ह्युम नावाच्या एका इंग्रजाने केली. या काँग्रेसमध्ये मोठमोठे आंग्लशिक्षित भारतीय दरवर्षी जमत व इंग्रज सरकारला आपल्या काही विनंत्या पेश करीत. स्वराज्य म्हणजे ब्रिटिश सत्तेपासून पूर्णपणे स्वतंत्र असे भारतीय राज्य असले पाहिजे ही आकांक्षा बोलून दाखविणे हे देखील अकल्पनीय व हा राजद्रोह ठरेल या भीतीने ग्रासलेली असे. आपल्या इंग्रजी प्रभुत्वाचे प्रदर्शन करणे व अखिल भारतीय मान्यता मिळविणे यासाठी काँग्रेसचे व्यासपीठ फार उपयुक्त होते. या व्यासपीठाचा उपयोग करूनच न्यायमूर्ति रानडे यांनी ब्रिटिश राज्य हा 'ईश्वरी न्याय' असला तरी त्याने भारताचे कसे आर्थिक शोषण चालविले आहे यावर अभ्यासपूर्ण व्याख्याने देऊन दाखवून दिले. त्यांचे शिष्य गोपाळ कृष्ण गोखले यांनीही अर्थशास्त्राचा गाढा अभ्यास करून त्यांचे कार्य पुढे चालविले. पण स्वराज्याची भाषा उच्चारणे त्यांनीही वर्ज्य मानले.

टिळकांनी मात्र स्वराज्याच्या मागणीचा प्रभावी उच्चार केला. स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही टिळकांच्या राष्ट्रीय कार्याची चतु:सूत्री होती. पुढे गांधींनी याच कार्यक्रमास उग्र स्वरूप दिले. राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतीत गांधी व टिळक यांच्यापेक्षाही अधिक भक्कम व चिरस्थायी कार्य डॉ हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काढून केले. ही संस्था आज अखिल भारताच्या सरकारची धुरा सांभाळण्याइतकी समर्थ झाली आहे.

गांधींनी टिळकांच्या चतु:सूत्रीला कायदेभंगाची जोड देऊन इंग्रज सरकार विरूद्ध नि:शस्त्र बंडच पुकारले. त्यामुळे स्वराज्याची भावना सार्वत्रिक झाली व सुभाषचंद्र बोस यांना नि:शस्त्र बंडाला सशस्त्र करणे शक्य झाले. ब्रिटिश सैन्याच्या वापराशिवाय साम्राज्य टिकविता येणार नाही ही परिस्थिति भारतातील स्वातंत्र्याच्या चळवळीने व त्यातूनच उद्भवलेल्या सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेच्या स्थापनेचे सिद्ध केली. तात्पर्य, स्वातंत्र्याच्या चळवळीला भिऊन इंग्रज पळून गेले हा भ्रम असला तरी ती चळवळ झाली नसती तर ते गेले नसते हे निश्चित. आझाद हिंद फौजेची स्थापना करून सुभाषचंद्र बोस यांनी ब्रिटिशाशी रणांगणावर टक्कर दिली. ही गोष्ट त्यापूर्वी भारतात स्वराज्याच्या कल्पनेने भारलेली देशव्यापी चळवळ झाली होती त्यामुळे शक्य झाली. भारताच्या स्वातंत्र्याच्या नावाने आवाहन केल्यावर हजारो सैनिकांनी त्याला प्रतिसाद दिला. असे पहिल्या महायुध्दाच्या वेळी होऊ शकले नाही कारण त्यावेळी देशात स्वातंत्र्याची देशव्यापी व कृतिशील चळवळच नव्हती. पिंगळे ज्या क्रांतिकारकांनी ब्रिटिश सैन्यात बंड करवून स्वराज्यासाठी सेना स्थापण्याचा प्रयत्न केला त्यांना दारूण अपयश येऊन ते फाशी गेले.

❋ ❋ ❋